# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जळगाव **P.S.(ठाणे):** जळगांव शहर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0138 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**12/04/2025 04:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 11/04/2025
**Time Period (कालावधी):** पहर 7 **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/04/2025
**Time From (वेळेपासून):** 21:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 21:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 12/04/2025 **Time (वेळ):** 03:48 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 008
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/04/2025 03:48 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** जळगाव शहर पोलीस ठाण्यात , जळगाव,जळगाव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्रीकांत भास्कर देवरे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | संत मिराबाई नगर पिप्राळा,जळगाव,जळगांव शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | संत मिराबाई नगर पिप्राळा,जळगाव,जळगांव शहर,जळगाव,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9834776052

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | पोहेक रविंद्र प्रभाकर सोनार | | | 1. जळगांव शहर पोस्टे,जळगांव, जळगांव शहर,जळगाव,महाराष्ट्र, भारत |
| 2 | पोहेक धनराज नारायण निकुंभ | | | 1. जळगांव शहर पोस्टे,जळगांव, जळगांव शहर,जळगाव,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** anil viththal bhavari
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):
सदरच्या FIR मध्ये सोबत टंकलिखीत केलेली फिर्याद जोडली आहे .

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
anil viththal bhavari(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

२ आर.बी)
९)

# फिर्याद

जळगाव शहर पो.स्टे.
दिनांक ११.०४.२०२५

**मी श्रीकांत भास्कर देवरे, वय–४२ वर्षे, व्यवसाय– नोकरी, रा.संत मिराबाई नगर, पिंप्राळा, जळगाव. मो.नं. ९८३४७७६०५२**

समक्ष फिर्याद देतो की, मी भारतीय सिमा सुरक्षा बलात कॉन्स्टेबल पदावर कार्यरत असुन माझी सध्या नेमणुक त्रिपुरा येथे आहे. माझे सन २००९ मध्ये सौ.रेखा हिचे सोबत लग्न झाले असुन मला दोन मुली व एक मुलगा असे अपत्य आहेत.

माझे व पत्नी सौ.रेखा देवरे हिचेमध्ये कौटुंबीक कारणावरुन भांडण झाले होते. त्याबाबत तिने माझे विरुध्द दि.०४.०२.२०२५ रोजी जळगाव शहर पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीवरुन भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ८५, ११८(१),११५(२),३५२,३५१(२),३५५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तपासकामी मला दि.२९.०३.२०२५ रोजी जळगाव शहर पोलीस ठाण्यात चौकशीकामी बोलावले होते. त्यावेळी पोलीस हवलदार श्री.रविंद्र सोनार यांनी मला गुन्हयाचे अनुषंगाने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम ३५(३) प्रमाणे नोटीस दिली होती.

त्यानंतर दि.१०.०४.२०२५ रोजी जळगाव शहर पोलीस स्टेशनचे हवलदार श्री.धनंजय निकुंभ यांनी मला फोन करुन माझे विरुध्द दाखल गुन्हयाचे दोषारोप पत्र पाठवुन योग्य ती मदत करण्यासाठी त्यांचे व हवलदार श्री.रविंद्र सोनार यांचेकरिता ५० हजार रुपयांची मागणी केली होती. परंतु मला त्यांनी मागणी केल्याप्रमाणे लाचरक्कम देण्याची ईच्छा नव्हती. म्हणुन सदर लाच मागणी प्रकाराबाबत मी पोलीस निरीक्षक स्मिता नवघरे,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जळगाव यांचेकडे तक्रार लिहुन दिली होती.

मी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचमागणी पडताळणी करण्यासाठी पोलीस निरीक्षक नवघरे यांनी मला व पंच श्री.योगेश निकम यांना आवश्यक त्या सुचना देवुन, व्हाईस रेकॉर्डर चालु करून, ते माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन देवुन, मला व पंच श्री. योगेश निकम यांना माझे कडील कारने बहिणाबाई उद्यान,जळगाव येथुन पोलीस हवलदार श्री.निकुंभ व श्री.सोनार यांची भेट घेण्यासाठी जळगाव शहर पोलीस ठाण्यात पाठविले होते. त्याप्रमाणे मी व पंच श्री. योगेश निकम असे सदर ठिकाणी गेलो होतो. परंतु पोलीस हवलदार श्री.निकुंभ व श्री.सोनार दिसुन आले नाहीत. म्हणुन मी थोडावेळ तेथे थांबुन सापळा अधिकारी नवघरे यांनी दिलेल्या सुचने प्रमाणे हवलदार श्री.निकुंभ यांना फोन करुन, माझे फोनचा स्पिकर ऑन करुन, ''जळगाव शहर पोलीस स्टेशनला आलो आहे. सोनार दादा पण पण नाही हे'' असे सांगीतले. तेव्हा त्यांनी ''मी लावतो त्यांना फोन, तेथे बोलावुन घेवु आपण, आलो दहा मिनीटात'' असे बोलुन फोन कट केला होता. त्यानंतर मी सदर ठिकाणी थांबुन असतांना मला हवलदार श्री.निकुंभ यांचा फोन आला. त्यावेळी मी माझे फोनचा स्पिकर ऑन केला. त्यांनी मला ''साक्षिदार आणले आहे न, तुम्ही त्यांचे आधारकार्ड घेवुन घेतले, आणले आहे न पैसे'' अशी विचारणा केली. तेव्हा मी त्यांना ''पैसे घेवुन येईल मी किती आणु?'' असे विचारले असता त्यांनी मला ''५० सांगीतले होते पण मी त्यांना २० सांगीतले, तो म्हणे तुझ्यासाठी करुन देतो'' असे म्हणाले. तेव्हा मी त्यांना ''कमी करा न'' असे म्हणालो असता त्यांनी ''कमी केले न मी, ३० केले'' असे बोलुन ''मी ऑफिसला आल्यावर बोलतो तुमच्याशी, पोलीस स्टेशनला पोहचतो आहे'' असे सांगीतले.

त्यानंतर हवलदार श्री.निकुंभ हे त्यांचे मोटर सायकलने जळगाव शहर पोलीस ठाण्यात आले. त्यांनी मला ''पहिले ५० म्हणत होते'' असे सांगीतले. तेव्हा मी त्यांना ''दादा रोज टेंशन घेतो आहे मी'' असे म्हणालो असता त्यांनी मला ''त्यासाठी तर तुला मुक्त करायचे आहे न, तुला अटक करणार नाही, नोटीस देवुन देईल'' असे बोलुन त्यांचे मोबाईल फोन वरुन हवलदार श्री.सोनार यांना फोन करुन मी आलो असल्याचे सांगीतले. त्यानंतर हवलदार निकुंभ यांनी हवलदार सोनार यांना फोन करुन ''त्याचेकडुन कोणते डॉक्युमेंट घ्यायचे, त्याचेकडे साक्षिदार नाहीत, त्याला ॲडजस्ट करुन घ्या, त्याचे बाजुन कागदे बनवुन द्या, कंपनीला काही पत्र पाठवु नका, त्यांना मोकळ करुन द्या'' असे बोलुन फोन कट केला. त्यानंतर त्यांनी तडजोडीअंती माझेकडे २० हजार रुपयांची मागणी केली. तेव्हा मी त्यांना ए.

टी.एम.मधुन पैसे काढुन आणतो असे सांगुन पंच श्री. योगेश निकम यांचेसह सापळा पथकाजवळ परत निघुन येवुन घडलेली हकीकत सापळा पथकास सांगितली. त्यानंतर सापळा पथकाने माझे व हवलदार श्री.निकुंभ यांचेमध्ये फोनवर व प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेले तसेच त्यांचे हवलदार श्री.सोनार यांचे सोबत फोनवर झालेले संभाषण ऐकुण लाच मागणी बाबत खात्री केली होती.

त्यानंतर सापळा अधिकारी नवघरे यांनी मला, पंच श्री.योगेश निकम व सापळा पथकास पुढील सापळा कारवाईचे अनुषंगाने आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यांचे सांगणे प्रमाणे मी हवलदार श्री.निकुंभ व श्री.सोनार यांना देण्यासाठी २०,०००/—रुपये (त्यात ५०० रुपये दराच्या ४० नोटा) सापळा पथकाकडे दिल्या. पंचासमक्ष सदर नोटांचे नंबर एका कागदावर लिहुन घेण्यात आले. व सदर नोटांना ॲन्थ्रासिन पावडर लावुन, त्या माझ्या पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन देण्यात आल्या.

त्यानंतर सापळा अधिकारी नवघरे यांनी मला व पंच श्री.योगेश निकम यांना योग्य त्या सुचना दिल्या. त्यांचे सुचने प्रमाणे व्हाईस रेकॉर्डर चालु करून, माझे शर्टचे आतील बाजुस गळयात अडकावुन देण्यात आले. त्यानंतर मला हवलदार श्री.निकुंभ यांचे दोन वेळा फोन आले. परंतु मी गाडी चालवत असल्याने त्यांचे फोन रिसीव्ह केले नाही. म्हणुन मी त्यांना फोन करुन ''मित्राकडुन पैशांची व्यवस्था करतो आहे, झाल की कॉल करतो'' असे बोलुन फोन कट केला. त्यानंतर सापळा अधिकारी नवघरे यांनी मला व पंच श्री.योगेश निकम यांना हलवदार श्री.निकुंभ व श्री.सोनार यांचे मागणी प्रमाणे त्यांना २० हजार रुपये लाच रक्कम देण्यासाठी बहिणाबाई उद्यान,जळगाव येथुन माझे कारने जळगाव शहर पोलीस स्टेशन येथे पाठवले होते.

तेव्हा माझी तेथे हवलदार श्री.सोनार यांचे सोबत भेट झाली. मी त्यांना ''हवलदार श्री.निकुंभ यांनी तुम्हाला भेटायला सांगीतल आहे, मी मित्राला कॉल करुन अरेन्जमेंट केली, मी त्यांना फोन करतोय तर ते फोन पण उचलत नाही'' असे म्हणालो असे बोलुन माझे पॅन्टच्या पुढील उजव्या बाजुच्या खिश्यातुन २०,०००/—रुपये लाच रक्कम काढुन त्यांचे समोर धरली. त्यांनी मला 'ठेव इथे किती हे ते'' असे बोलुन सदर लाच रक्कम मला पोलीस ठाण्यात असलेल्या पत्र्याचे कपाटातील कप्प्यात ठेवण्यास सांगीतले. तेव्हा मी त्यांना ''२० आहे'' असे बोलुन सदर लाच रक्कम त्यांचे सांगणे प्रमाणे पत्र्याचे कपाटातील कप्प्यात ठेवुन देवुन, माझे कानात बोट घालुन,सापळा पथकास लाच रक्कम स्विकारले बाबत ईशारा केला. त्यानंतर सापळा पथकाने सदर ठिकाणी येवुन हवलदार श्री.सोनार यांना जागीच लाच रक्कमेसह रंगेहात पकडुन ताब्यात घेतले होते. सदर वेळी मला त्यांचे व हवलदार श्री.निकुंभ यांचे पुर्ण नाव पोहेकॉ/३२०० रविंद्र प्रभाकर सोनार, वय ४६ वर्षे व पोहेकॉ/१६२० धनराज नारायण निकुंभ, दोन्ही नेमणुक जळगाव शहर पोलीस स्टेशन असे असल्याचे समजले असुन तसा संपुर्ण सापळा कारवाईचा पंचनामा करण्यात आला आहे.

तरी पोहेकॉ/१६२० धनराज नारायण निकुंभ यांनी माझी पत्नी हिने माझे विरुध्द जळगाव शहर पोलीस ठाण्यात गु.र.नं.३८/२०२५, भारतीय न्याय संहिता सन २०२३ चे कलम ८५,११८(१),११५(२), ३५२,३५१(२),३५५ प्रमाणे दि.०४.०२.२०२५ रोजी दाखल केलेल्या गुन्हयाचा माझे बाजुने तपास करुन, सदर गुन्हयात मला अटक न करता नोटीस देवुन, माझे कंपनीला रिपोर्ट न पाठवण्याचे मोबदल्यात पोहेकॉ/३२०० रविंद्र प्रभाकर सोनार यांचेसोबत फोनद्वारे चर्चा करुन प्रथम ५० हजार रुपयांची मागणी करुन, तडजोडीअंती माझेकडुन २० हजार रुपये लाच रक्कम स्विकारण्यास मान्यता दिली. त्याप्रमाणे पोहेकॉ/३२०० रविंद्र प्रभाकर सोनार यांनी सदर लाचरक्कम माझेकडुन दि.११.०४.२०२५ रोजी २१.३० वा.चे सुमारास जळगाव शहर पोलीस ठाण्यात पंचासमक्ष स्वत: स्विकारली म्हणुन माझी फिर्याद आहे.

**समक्ष**

**ही फिर्याद दिली,**

**सही,दि.११.०४.२०२५**

स्मिता नवघरे
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
जळगांव